प्रेस नोट १३/०५/२०१९

## पेट्रोलपंपावरील स्वाईप कार्ड मशीनमध्ये एटिएम कार्डच्या वापर करुन फसवणुक करणाऱ्या आरोपीस हडपसर पोलीसांकडुन अटक

पुणे शहरातील गंभीर गुन्हयांना प्रतिबंध करुन, गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, हडपसर विभाग पुणे यांचे सुचनानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांचेकडून हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत विशेष मोहिम राबविण्यात येत होती.

हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ४०७/२०१९ भादविक ४२० मधील फिर्यादी अंजिक्य अशोक टेकवडे, वय २८ वर्षे, धंदा व्यवसाय, रा. प्लॉट नं. २८२,इंद्रप्रस्थ सोसायटी, आकाशवाणी, हडपसर, पुणे यांचे गेले एक वर्षापासुन वेळोवेळी टेकवडे पेट्रोलपंप, आकाशवाणी समोर, हडपसर पुणे येथे गाडीमध्ये पेट्रोल भरत असताना अगर पेट्रोल भरल्यानंतर स्टेट बॅक ऑफ इंडिया चे एटीएम कार्डचा वापर करुन पेट्रोलपंपावर असलेल्या एचडीएफसी स्वाईप कार्ड मशीन वर स्वाईप केल्यानंतर त्याची मशिनमधुन पहिली स्लिप काढलेनंतर मशिनवरील व्हॉईड बटन दाबुन केलेला व्यवहार रदद करुन एकुण ७,०१,४००/-रु. ची फसवणुक केलेली आहे. म्हणुन वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

हडपसर पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी संजय चव्हाण व कर्मचारी यांनी दाखल गुन्हयाचा बारकाईने अभ्यास करुन, वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार मिळालेल्या गोपनीय बातमीनुसार आरोपी नामे नवनाथ संपत महाडीक, वय २३ वर्षे रा. त्रिमुर्ती विहार बिल्डींग नं.१, तळमजला, दत्त मंदिराशेजारी, फुरसुंगी पुणे मुळगाव शिरापुर, सालसिटबाबा मंदिरा समोर, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर याला दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपी हा त्याचेकडील दुचाकी वाहन पेट्रोल भरण्याकरीता पेट्रोल पंपावर जावुन कमीत कमी पैश्याचे पेट्रोल भरुन, जास्त पैश्याची गरज आहे असे कारण सांगुन, स्वाईप कार्ड मशीन वर एटिएम कार्डचा वापर करुन जास्त पैश्याची स्पील काढत होता व पैश्याची स्लीप काढल्यानंतर ताबडतोब स्वाईप कार्ड मशिनवरील व्हॉईड बटन दाबुन केलेला व्यवहार रदद करत असत व पुर्वी काढलेल्या स्लीप नुसार पेट्रोल भरलेले पैसे कट करुन उर्वरित पैसे रोख स्वरुपात घेवुन फिर्यादीचे फसवणुक केल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा.पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पो.हवा. ८२३ युसुफ पठाण, पो. हवा. ५५६२ राजेश नवले, पो. ना. २८०० प्रताप गायकवाड, पो. ना. ५८९४ प्रमोद टिळेकर, पो. ना. ६४८९ विनोद शिवले, पो. ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो. शि. ८६९२ अकबर शेख, पो. शि. ७५१२ गोविंद चिवळे, पो. शि. ७६८४ शंशिकांत नाळे,पो शि ८३७६कांबळे, पो. शि. ४७९ शहिद शेख, पो. शि. ८७६१ ज्ञानेश्वर चित्ते यांनी केली आहे.